महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

=====================================================================

जावक क्रमांक – ७७१/६५ दिनांक :- १३ मे, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# अकराव्या म्हाडा लोकशाही दिनात ०२ अर्जांवर सुनावणी

## लोकाभिमुख निर्णयातून म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिला अर्जदारांना दिलासा

मुंबई, दि. १३ मे, २०२५ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) आज वांद्रे (पूर्व) येथील गृहनिर्माण भवनात अकरावा लोकशाही दिन आयोजित करण्यात आला. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या लोकशाही दिनात नागरिकांच्या ०२ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली. नागरिकाभिमुख दृष्टिकोनातून दोन्ही प्रकरणांमध्ये अर्जदारांना मोठा दिलासा देणारे निर्णय घेण्यात आले.

आजच्या लोकशाही दिनात श्री. मिलिंद कांबळे यांनी अर्ज केला होता. श्री. कांबळे यांना सन २००५ च्या म्हाडा कोकण मंडळाच्या सोडतीत बाळकुम ठाणे येथील योजनेतील सदनिकेसाठी यशस्वी अर्जदार ठरले. सन २०२२ मध्ये सदनिकेची विक्री किंमत भरण्याचे पत्र काही वैयक्तिक कारणास्तव श्री. कांबळे यांना उशिरा प्राप्त झाले. श्री. कांबळे यांनी सदनिकेच्या विक्री किंमतीचा संपूर्ण भरणा केला. मात्र, सदर विक्री किंमतीचा भरणा विलंबाने केल्यामुळे मंडळातर्फे श्री. कांबळे यांना व्याज आकारणीचे पत्र देण्यात आले. सदर व्याज भरू शकत नसल्याने त्याबाबत निर्णयासाठी श्री. कांबळे आज लोकशाही दिनात अर्ज केला होता. या अर्जावर सुनावणी करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी श्री. कांबळे यांचे सदनिकेची विक्री किंमत भरण्यास विलंब झाल्याबद्दल मंडळातर्फे आकारण्यात आलेले व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला. बाळकुम ठाणे येथील योजनेतील इतर यशस्वी पात्र लाभार्थ्यांच्या सदनिका विक्री किंमतीत कपात करण्याचा ठराव म्हाडाने यापूर्वीच केला आहे. सदर ठरावानुसार सदनिकेच्या विक्री किंमतीत झालेल्या कपातीचा लाभ अर्जदार घेणार नसल्याचे हमीपत्र सदर व्याज माफ करताना श्री. कांबळे यांच्याकडून घेण्यात आले.

श्री. ओमप्रकाश राठी यांनी दक्षिण मुंबईतील व्ही. व्ही. चंदन रस्त्यावरील इमारत क्रमांक ५२-५४ या उपकरप्राप्त इमारतीतील सदनिका त्यांच्या नावे असताना इतर व्यक्तीच्या नावे करण्यात आल्याबाबत तक्रार अर्ज केला. या अर्जावर आजच्या लोकशाही दिनात सुनावणी देताना श्री. जयस्वाल यांनी अर्जदाराने लोकशाही दिन सुनावणी दरम्यान सादर केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करून उपमुख्य अभियंता यांच्या स्तरावर दि. १६ मे, २०२५ रोजी तात्काळ सुनावणी घेण्याचे निर्देश मंडळास दिले.

आजच्या लोकशाही दिनात म्हाडा मुंबई इमारत दुरूस्ती मंडळ व कोकण मंडळाशी संबंधित प्रत्येकी ०१ अर्जांवर सुनावणी घेण्यात आली. म्हाडा लोकशाही दिन उपक्रमांतर्गत सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी/अडचणी यांची न्याय्य व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून निराकरण करण्यात येत असल्याचे अनुभव अर्जदारांना आले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 771/65 Dt. May 13, 2025

## Press Release

# Two Public Grievances Addressed During MHADA's 11th Lokshahi Din

MHADA VP and CEO Shri Sanjeev Jaiswal Delivers Prompt Relief through Public-Focused Governance

Mumbai, May 13, 2025 – The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) organized its 11th Lokshahi Din today at MHADA headquarters at Bandra (East). The event was held under the chairmanship of Shri Sanjeev Jaiswal (IAS), Vice President and Chief Executive Officer of MHADA. Hearings were conducted on two public applications, and both cases concluded with citizen-friendly decisions providing significant relief to the applicants.

During today's Lokshahi Din, Mr. Milind Kamble submitted an application. Mr. Kamble had been declared a successful applicant in the 2005 Konkan Board lottery for a tenement under the Balkum, Thane housing scheme. Due to certain personal reasons, he received the payment demand letter in 2022, much later than expected. Mr. Kamble went on to pay the entire sale price of the tenement. However, since the payment was made after the stipulated time, the Board issued a demand notice for interest.

As Mr. Kamble was unable to pay the interest amount, he submitted an appeal during today's Lokshahi Din. After hearing the case, Mr Jaiswal decided to waive the interest amount charged due to the delayed payment.

However, MHADA had earlier passed a resolution to reduce the sale prices for other eligible successful beneficiaries under the same Balkum, Thane scheme. Accordingly, while waiving the interest, a written undertaking was taken from Mr. Kamble confirming that he would not claim the benefit of the reduced sale price under the scheme.

In yet another case, Mr. Omprakash Rathi submitted a complaint stating that a tenement in Cess Building No. 52–54 on V. V. Chandan Road, South Mumbai, which was originally in his name, had been wrongly allotted in the name of another person. During the hearing on this application in today's Lokshahi Din, Shri Sanjeev Jaiswal directed the Board to conduct an immediate hearing at the level of the Deputy Chief Engineer on May 16, 2025, after thoroughly examining the documents submitted by the applicant during the Lokshahi Din proceedings.

Today's Lokshahi Din included hearings on one application each from MHADA's Mumbai Building Repairs & Reconstruction Board and Konkan Board. The initiative once again reaffirmed MHADA's commitment to fair, prompt, and transparent resolution of public grievances through direct administrative engagement.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---


म्हाडा
MHADA
म्हाडा
लोकशाही
दिन